# संपादकीय

## विमानतळ बाजारपेठेला धुमारे

विमानतळांना विमान प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांकडून मिळणाऱ्या महसुलातूनच उत्पन्न मिळत होते. विमान थांब्याचे भाडेही उत्पन्नाचे एक साधन होते; परंतु आता वाढीचा पुढील टप्पा अधिक विमानसेवा पुरवण्याने नव्हे, तर अधिक हुशारीने विक्री करण्याने येणार आहे. भारताच्या नवीन विमान वाहतूक अर्थव्यवस्थेत आकाश ही आता मर्यादा राहिलेली नाही. तीच आता एक बाजारपेठ बनली आहे. रतातील विमानतळांसाठी सीट अपग्रेड आणि लाउंजसह पूरक उत्पन्न आता नफ्याचे एक प्रमुख साधन बनले आहे. ते विमानतळांना चैतन्यपूर्ण ग्राहक केंद्रांमध्ये रूपांतरित करत आहे आणि हवाई प्रवासाचे भविष्य नव्याने परिभाषित करत आहे. आता तुम्ही दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल तीनवर असाल, तर उशीर होण्याचे कारण कदाचित डिपार्चर गेट नसेल, तर नवीन शनेल बुटीक असेल. हैदराबादमध्ये विमानात चढण्यापूर्वी गॉर्डन रॅमसे बर्गर खाण्याचा मोह होऊ शकतो. संपूर्ण भारतात याच पद्धतीने विमानप्रवासाची नव्याने आखणी केली जात आहे. आता विमानप्रवास केवळ गंतव्यस्थानी पोहोचण्यापुरता मर्यादित नाही; तर प्रवासी मधल्या वेळेत तास कसे घालवतात, यालाही महत्त्व आले आहे. भारताच्या विमान वाहतूक उद्योगासाठी आता आकाशात नाही, तर जमिनीवर सर्वात महत्त्वपूर्ण वाढ होत आहे. नॉन–तिकीट आणि गैर–विमानचालन महसूल प्रवाह हे या क्षेत्राचे सर्वात मजबूत वाढीचे इंजिन बनले. तिकीट विक्रीमुळे प्रवासी येतात; परंतु सीट अपग्रेड, लाउंज, प्रीमियम जेवण, जाहिरात, ब्रँडेड किरकोळ विक्री आणि विशेष अनुभव यांसारख्या अतिरिक्त सेवांमुळे नफ्याचे प्रमाण वाढत आहे. महसूल निर्मितीच्या पद्धतीत ही खेळी एक स्पष्ट बदल दर्शवत आहे. जागतिक स्तरावर विमान वाहतूक उद्योगाच्या नफ्यासाठी पूरक महसूल दीर्घकाळापासून महत्त्वाचा मानला जात आहे. आजघडीला हिथ्रो, चांगी आणि दुबईसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवर ४० ते ५० टक्के महसूल नॉन–तिकीट स्रोतांमधून येतो. भारतही यात मागे नाही. विमानतळ आणि एअरलाइनच्या उत्पन्नात पूरक सेवांचे योगदान २५ ते ३५ टक्के आहे. उद्योग अंदाजांनुसार, डिजिटायझेशन आणि प्रीमियम अनुभवांची वाढती मागणी या बदलाला गती देत आहे. भारतात हा बदल दोन पातळ्यांवर होत आहे. विविध एअरलाइन्स तिकीट विक्रीपलीकडे जाऊन आपल्या सेवांचे जाळे सर्व्हिस इकोसिस्टीममध्ये रूपांतरीत करत असून विमानतळे रिटेल विक्री, खानपान सेवा आणि मीडिया यांचे हब बनत आहे. ‘एअर इंडिया’मध्ये टाटा समूह करत असलेला कायापालट नवी विमाने आणि नवीन ब्रँडिंगपुरता मर्यादित नाही. ही एअरलाइन कंपनी प्रवाशांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यातून कमाई करण्यासाठी एक मजबूत पूरक सेवा पोर्टफोलिओ तयार करत आहे. पूरक महसूल आर्थिक वर्ष २०२४ मधील १,७०० कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. २०२७ पर्यंत ही विमान कंपनी ‘अपग्रेड प्लस,’ ‘सीट अपग्रेड’, अतिरिक्त सामान, भाडे लॉक, प्रवास विमा, गिफ्ट कार्डस आणि ‘व्हीएफएस ग्लोबल’च्या ‘वनवास्को व्हिसा कॉन्सियरज’सारख्या सेवांद्वारे हा महसूल तिप्पट करण्याचे लक्ष्य ठेवत आहे. प्रवाशांना ‘फ्लाय प्रायर’सारख्या सेवा आवडत आहेत. त्यामुळे जादा शुल्क देऊन त्याच दिवशी फ्लाइट बदलता येते. ‘झिपअहेड’द्वारे प्राधान्य चेक–इन, टॅक्सी बुकिंगसाठी टाय–अप आणि टाटा एआयजी प्रवास विमा यांसारख्या इतर सेवा सोयीचे रूपांतर महसुलात करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. ‘सीट निवडण्यापासून टॅक्सी बुकिंगपर्यंत प्रत्येक उत्पादन, ब्रँडला प्रवाशांच्या निर्णय प्रक्रियेत टिकवून ठेवते’, असे एका एअरलाइन अधिकाऱ्याने सांगितले. ‘इंडिगो’चा मोठ्या प्रमाणावरील फायदा दर्शवतो, की पूरक महसूल वाढ किती दूर जाऊ शकते. सध्या खासगी विमानतळे एअरलाइन्सच्या धोरणाचे अनुकरण करत आहेत. गैर–विमानचालन महसूल आता त्यांच्या व्यवसाय मॉडेलचा केंद्रबिंदू बनला आहे. दिल्ली आणि हैदराबाद विमानतळांचे संचालन करणाऱ्या जीएमआर एअरपोर्टसमध्ये गैरविमान वाहतूक (नॉन–एरो) उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३–२४ मधील ४३ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये ४७ टक्क्यांपर्यंत वाढले आणि आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी वाढले. किरकोळ विक्री, ड्युटी–फ्री उत्पादनांची विक्री, खाद्य आणि पेय (एफ अँड बी) आणि इतर सेवा या वाढीमध्ये आघाडीवर आहेत. ‘भारताचे विमान वाहतूक क्षेत्र विस्ताराच्या नवीन टप्प्यात प्रवेश करत असताना आम्हाला प्रवासी वाढ आणि खर्च या दोन्हीला चालना देणारे मजबूत अनुकूल घटक दिसत आहेत,’ असे ‘जीएमआर एअरपोर्टस’चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (वाणिज्य आणि विकास) राजेश अरोरा यांनी सांगितले. आम्ही केवळ पायाभूत सुविधांचे संचालक या भूमिकेतून विकसित होऊन एक वैविध्यपूर्ण ग्राहक मंच बनलो आहोत आणि विमानतळांना मूल्य प्रदान करणाऱ्या गंतव्यस्थानांमध्ये रूपांतरित केले आहे, असे ते म्हणाले. आठ विमानतळांचे संचालन करणाऱ्या ‘अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड’ने (एएएचएल) आर्थिक वर्ष २०२५ मध्ये गैरविमान वाहतूक महसुलातून चार हजार ९२६ कोटी कमावले. हे उत्पन्न ‘अदानी एअरपोर्टस’च्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास निम्मे आहे. एप्रिल मून रिटेल आणि मुंबई ट्रॅव्हल रिटेलसारख्या उपकंपन्या विस्तारणाऱ्या इन–हाऊस किरकोळ विक्री मॉडेलला चालना देत आहे. अदानी समूह विविध टप्प्यांमधील शहरस्तरीय प्रकल्पांमध्ये चार अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करत आहे. त्यापैकी जवळपास ७० टक्के रक्कम मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांसाठी राखून ठेवण्यात आली. यामध्ये प्रवासी, कर्मचारी आणि शहरातील ग्राहकांना सेवा देणाऱ्या वैयक्तिकृत, डेटा–आधारित किरकोळ व्यवसायावर भर दिला जात आहे.

# खूप साधा, रोजच्या ओपीडी मधला हा प्रसंग खरं तर समाजाच्या खोलवर रुजलेल्या अंधश्रद्धेचं विदारक चित्र दाखवतो

काही दिवसांपूर्वी ओपीडीमध्ये नेहमीप्रमाणे एक महिला रुग्ण आली. तपासणी झाली, आवश्यक रक्ततपासण्या केल्या, निदान स्पष्ट केलं. योग्य उपचार म्हणून महिन्याचा औषधांचा कोर्स दिला आणि नेहमीप्रमाणे सांगितलं गोळ्या संपल्यावर परत दाखवायला या. आज ती पुन्हा आली, पण तपासणीसाठी नाही; अर्ध्या गोळ्या परत करायला. कारण विचारलं, तर उत्तर आलं आजीकडं सुकून पाहिलं, देवाचं निघालं आमचं राहिलं. विषय संपला किस्सा तिथे संपतो. पण प्रश्न तिथूनच सुरू होतो. आज विज्ञानाने माणसाच्या हातात जीव वाचवण्याची ताकद दिली आहे. रक्त तपासण्या, औषधं, शस्त्रक्रिया हे सगळं अनुभव, संशोधन आणि पुराव्यांवर उभं आहे. तरीसुद्धा सुकून पाहिलं हा निकाल औषधांपेक्षा जास्त विश्वासार्ह वाटतो, ही वस्तुस्थिती आम्हाला डॉक्टर म्हणून अस्वस्थ करणारी आहे. अंधश्रद्धा ही फक्त अज्ञानातून जन्माला येते असं नाही; ती भीतीतून, असहायतेतून आणि चुकीच्या परंपरांतून पोसली जाते. आजारपण आलं की माणूस मानसिकदृष्ट्या कमकुवत होतो. अशा वेळी कुणी देवाचं आहे असं सांगितलं, की जबाबदारी झटकल्यासारखं वाटतं. उपचार करण्यापेक्षा नशीब मान्य करणं सोपं वाटतं. यासाठीच आपल्या समाजात अनेक महापुरुषांनी आवाज उठवला. संत तुकारामांनी कर्मकांडापेक्षा विवेक महत्त्वाचा असल्याचं सांगितलं. संत गाडगे महाराजांनी देव मंदिरात नाही, तर माणुसकीत आहे हे शिकवलं. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंधश्रद्धेच्या मुळावर घाव घातला. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवण्यासाठी आयुष्य वेचलं आणि त्यासाठी प्राणही दिले. तरीही आज, एकविसाव्या शतकात, रुग्ण अर्ध्या गोळ्या परत करतो आणि देवाचं निघालं असं सांगतो, हे वास्तव आहे. अंधश्रद्धा फक्त व्यक्तीचं नुकसान करत नाही; ती समाजाच्या आरोग्यावर घाला घालते. चुकीच्या समजुतींमुळे उपचार अर्धवट राहतात, आजार बळावतो, रुग्णांची हानी होते. देवावर श्रद्धा असण्यात चूक नाही. पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक आहे. श्रद्धा माणसाला बळ देते, तर अंधश्रद्धा त्याचं विवेकशक्ती हिरावून घेते. औषध घेताना देवाचं नाव घेणं वेगळं; औषधच बंद करून देवावर सोपवणं हे वेगळं. अशा अंधश्रद्धा पसरवणाऱ्या भोंदू लोकांपासून पासून सावधान राहायला हवं.

**डॉ रामप्रसाद श्रीराम राऊत**
ईरा हॉस्पिटल घाटसावळी

पान १ वरून...

### बीड ग्रामीण, पिंपळनेर...

आला आहे. अशा तर्हेने तीन कारवायांमध्ये बीड ग्रामीण आणि पिंपळनेर पोलिसांनी एकूण ७९ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, उपाधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली बीड ग्रामीण पोलीस व पिंपळनेर पोलीस यांनी केली आहे.

### आडस येथे कडकडीत...

ऋषिकेश आडसकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज गुरुवारी आडस येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. यामध्ये सर्वांनी सहभाग घेत बाजारपेठ बंद ठेवली आहे. तर सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ग्रामस्थांनी एकत्र येत अजित दादांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २९/०१/२०२६

**CHANGE IN NAME**

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME :** DURGADAS ANNANTRAO DESHPANDE
**CHANGE IN TO MY NEW NAME :** DURGADAS ANANTRAO DESHPANDE
**PRESENT ADD :** H/N 1-3-1603, CHANAKYA PURI, BEED, MAHARASHTRA - 431122
MO. 9422740492

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २९/०१/२०२६

**CHANGE IN NAME**

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME 1st :** IRFANA
**Old NAME 2nd :** IRFANA BEGUM MOHAMMAD AZAM MOMIN
**CHANGE IN TO MY NEW NAME :** IRFANA BEGAM MOHAMMAD AZAM MOMIN
**PRESENT ADD :** BHAGVAN NAGAR GEVRAI AT PO GEVRAI TQ GEORAI DIST BEED-431127, Maharashtra
MO. 9422549186

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७४/२०२६
कमल भ्र. ज्ञानोबा राठोड व इतर वि. निरंक
(मार्फत – ॲड. ए.पी.धोंडरे, गेवराई)

अर्जदार – १. कमल भ्र. ज्ञानोबा राठोड, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. जातेगांव ता. गेवराई जि. बीड.
२. विकास पि.ज्ञानोबा राठोड, वय २६ वर्षे, धंदा शेती, रा.सदर.
३. विशाल पि.ज्ञानोबा राठोड, वय २४ वर्षे, धंदा शेती, रा.सदर.
४. सिमा भ्र.बाळासाहेब जाधव, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा.जायकोवाडी तांडा, माजलगांव ता.माजलगांव जि.बीड.
५. तुळसाबाई भ्र.उमाजी राठोड, वय ७३ वर्षे, धंदा शेती, रा.जातेगांव ता. गेवराई जि. बीड.

ज्याअर्थी मयत ज्ञानोबा पि.उमाजी राठोड, रा.जातेगाव ता.गेवराई जि.बीड. हे / हया दिनांक २८/०९/२०२० रोजी रा.जातेगाव ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ५ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे ज्ञानोबा पि.उमाजी राठोड, रा.जातेगाव ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०९/०३/२०२६.

क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६४/२०२६
तसलीम – विरूध्द – मोहम्मद इब्राहीम
(मार्फत ॲड एस.ए. गायकवाड)

ज्याअर्थी मयत नामे १. महमद खमरोद्दीन महमद दादामिया २. शमिमबी खमरूद्दीन शेख हे/या अनुकमे दिनांक २०.१०.२०१० व २९/०४/२०२१ रोजी मौजे मोमीनपुरा गेवराई ता.गेवराई जि.बीड येथे मयत झालेले आहेत.
अर्जदार – १) तसलीम बेगम मोहम्मद शारेख मोमिन वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा.लोहर गल्ली, जुना बाजार बीड ता.जि.बीड.
२. आफरिन बेगम कलीम धांडे वय ३४ वर्षे धंदा घरकाम रा.झवेरी वार्ड, पैठण ता.पैठण जि.छ.संभाजीनगर
३. सरवरी बेगम मुजम्मील पटेल वय ३७ वर्षे धंदा घरकाम रा.सरस्वती कॉलनी नं. २ गेवराई ता.गेवराई जि.बीड.
गैरअर्जदार
१. मोहम्मद इब्राहीम मोहम्मद खमरोद्दीन वय ५३ वर्षे धंदा व्यापार रा.मोमीनपुरा गेवराई ता.गेवराई जि.बीड.
२. मोहम्मद अब्दुल खुदुस मोहम्मद खमरोद्दीन वय ४८ वर्षे धंदा व्यापार रा.मोमीनपुरा गेवराई ता.गेवराई जि.बीड.
३. मोहम्मद फारूख मोहम्मद खमरोद्दीन वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा.सदर
४.शबाना बेगम मोहम्मद समीयोद्दीन वय ४० वर्षे धंदा व्यापार रा.मोमीनपुरा गेवराई ता.गेवराई जि.बीड.
५ मोहम्मद उजेफ समियोद्दीन वय १७ वर्षे धंदा शिक्षण अ.पा.क. अर्जदार क्र. ४ रा.सदर
६. अल्फीया मोहम्मद समियोद्दीन वय २२ वर्षे धंदा घरकाम रा.सदर
७.सानिया इरफान शेख वय २५ वर्षे धंदा घरकाम रा.सदर
८.निलोफर कलीम शेख वय ३० वर्षे धंदा घरकाम रा.पठाण मोहल्ला, अंबड ता.अंबड जि.जालना.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे १.महमद खमरोद्दीन महमद दादामिया व २.शमिमबी खमरुद्दीन शेख रा.मोमीनपुरा, ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०४/०३/२०२६.

क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
श्रीमती एस एच पाटील यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७३/२०२६
यशोदाबाई विरुध्द निरंक
(मार्फत – ॲड.ए.एस.राठोड)

ज्याअर्थी मयत नामे गोटीराम पि.उत्तम पवार हे / या दिनांक १०/१२/२०२२ रोजी मौजे पाचेगाव ता.गेवराई जि.बीड येथे मयत झालेले आहेत.
अर्जदार – १.यशोदाबाई भ्र.उत्तम पवार, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा.वसंत नगर तांडा,पाचेगाव ता.गेवराई जि.बीड.
२.उत्तम पि.वालु पवार, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा.वसंत नगर तांडा,पाचेगाव ता.गेवराई जि.बीड.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे गोटीराम पि.उत्तम पवार, रा.वसंतनगर तांडा, पाचेगाव ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १२/०३/२०२६.

क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २९/०१/२०२६

**CHANGE IN NAME**

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME :** SHAIKH DILSHAD AFSAR
**CHANGE IN TO MY NEW NAME :** DILSHAD RAFIK SAYYAD
**PRESENT ADD :** NITRUD, NITRUD PO NITHRUD, DIST BEED MAHARASHTRA-431131
MO. 9850018377

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २९/०१/२०२६

**CHANGE IN NAME**

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME :** SAYYAD RAFIK SHAMSODDIN
**CHANGE IN TO MY NEW NAME :** SAYYAD RAFIK SHAMSHUDDIN
**PRESENT ADD :** RA.PO.NITRUD, TA,MAJALGAON,NITRUD, DIST BID, MAHARASHTRA-431131
MO. 9850018377

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६५/२०२६
मुक्तार पि. वजीर शेख व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. पी.बी. घारगे, गेवराई)

अर्जदार – १. मुक्तार पि.वजीर शेख, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड.
२. नजीर पि.वजीर शेख, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड.
३. अनसर पि.वजीर शेख, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड.
४. दुरेशा भ्र.सुलेमान शेख, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा.महांडुळा ता. गेवराई जि.बीड.
५. खतीजाबी भ्र.वजीर शेख, वय ८४ वर्षे, धंदा घरकाम, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड.

ज्याअर्थी मयत्त वजीर पि.कारभारी शेख, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड. हे / हया दिनांक २६/०७/२०१६ रोजी रा. महांडुळा ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र.१ ते ५ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे वजीर पि.कारभारी शेख, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०४/०३/२०२६.

क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

पान ४ वरून...

### लाखो रुपयांचे ...

पाण्याचा थेंब नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे अनायासे या वास्तूंचा उपयोग करणाऱ्यांना पाणी मिळत नसल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण आणि अस्वच्छता झालेली आहे. स्वच्छतेचा अक्षरशः बोजवारा उडालेला आहे. तरीही या इमारतीमध्ये असलेल्या विविध कार्यालयातील अधिकाऱ्यांचे याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे. तर दुसरीकडे मात्र याच कार्यालयातील अधिकाऱ्यांनी नुकतेच २६ जानेवारी रोजी याच कार्यालयाच्या आवारात मोठ्या दिमाखात भारताचा तिरंगा झेंडा फडकवून प्रजासत्ताक दिन साजरा केला. यामुळे सामाजिक न्याय भवनात प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा केला जातो. मात्र लाखो रुपयांचे बोअर व पाण्याची टाकी असूनही स्वच्छतेचा मात्र बोजवारा उडविला जातो असे दिसून आले असे उद्विग्न मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

### गिरीश महाजन यांच्यावर...

प्रजासत्ताक दिन हा संविधानाचा उत्सव असताना संविधान निर्मात्याचे नाव न घेणे हे तमाम भारतीयांच्या, विशेषतः अनुसूचित जातीतील नागरिकांच्या भावना दुखावणारे असून सामाजिक तेढ निर्माण करणारे आहे. त्यामुळे ही कृती ट्रॉसिटी क्टनुसार थेट गुन्हा ठरते, असे निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, या प्रकरणाला वाचा फोडणाऱ्या वन विभागातील कर्मचारी सौ. माधवी जाधव यांच्यावर निलंबन किंवा अन्य प्रशासकीय कारवाई करण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याची माहिती मिळत असून, सत्य मांडणाऱ्यांवर दडपशाही होऊ नये, अशी ठोस मागणीही करण्यात आली आहे. सत्य सांगणाऱ्यांवर कारवाई करणे हे लोकशाही मूल्यांच्या पूर्णतः विरोधात असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

यावेळी पुढील मागण्या करण्यात आल्या मा. गिरीश महाजन यांच्यावर ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करून तात्काळ राजीनामा घ्यावा,प्रजासत्ताक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानिक योगदानाबाबत राज्यभर जनजागृती शिबिरे राबवावीत, सौ. माधवी जाधव यांच्यावर होणारी कोणतीही अन्यायकारक कारवाई तात्काळ थांबवावी.या सर्व मागण्यांचे निवेदन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत सादर करण्यात आले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा संघटक अर्जुन जवंजाळ, वाघमारे बी.एन, शेळके ए.बी, शिंदे एस.एस, गणपत लोणके, बनसोडे जी.एच, ड.कांबळे हनुमंतराव, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष ससाने राजेंद्र, अशोक ठोकळ, रमेश माटे, गौतम सोनवणे, जाधव जी.के, ए.एन सोनवणे, संतोष जोगदंड, भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष ड.केतन गायकवाड, दीपक कांबळे, श्यामसुंदर जाधव, मिलिंद सरपते, लखन जोगदंड, चेतन पवार, उमेश तूळवे

पान ४ वरून...

यांच्यासह असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, वकील, सामाजिक कार्यकर्ते व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २९/०१/२०२६

**CHANGE IN NAME**

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**OLD NAME :** HANUMANT UDHAV GAT
**CHANGE IN TO MY NEW NAME :** HANUMAN UDHAV GAT
**PRESENT ADD :** MU SHIRAPUR GAT POST ARI TA SHIRUR KASAR DIST BEED-413249

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २९/०१/२०२६

**CHANGE IN NAME**

*I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME*

**Old NAME :** MOHAMAD AZAM MOHAMAD ABDULLAH MOMIN
**CHANGE IN TO MY NEW NAME :** MOHAMMAD AAZAM MOHAMMAD ABDUL MOMIN
**PRESENT ADD :** BHAGVAN NAGAR GEVRAI AT PO GEVRAI TQ GEORAI DIST BEED-431127, Maharashtra
MO. 9422549186

### जाहीर प्रगटन

मा.श्रीमती,वंदना व्ही.जोशी, दिवाणी न्यायाधीश
व.स्तर, बीड,ता.जि.बीड यांच्या न्यायालयात.
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७८/२०२६
ॲड.श्री.व्ही.बी.जगताप यांच्या मार्फत
अर्जुन पि.तुकाराम वाघमारे व इतर वि.निरंक

ज्यापेक्षा १)तुकाराम पि.बाबुराव वाघमारे,२)देवनाबाई उर्फ देऊबाई भ्र.तुकाराम वाघमारे,दोघेही रा.नाळवंडी, ता.जि. बीड हे अनुक्रमे दिनांक ०८/०९/२०१६,दिनांक २३.०३.२०२२ रोजी नाळवंडी, ता.जि.बीड,येथे मयत झालेले आहे,आणि तसेच अर्जदार
१.अर्जुन पि.तुकाराम वाघमारे, वय–७०वर्षे,धंदा–शेती,रा.नाळवंडी,ता.जि.बीड.
२.त्रिंबक पि.तुकाराम वाघमारे, वय–६४वर्षे,धंदा–शेती,रा.नाळवंडी,ता.जि.बीड.

अर्जदार क्र.१ व २ हे मयत नामे १)तुकाराम पि.बाबुराव वाघमारे,२)देवनाबाई उर्फ देऊबाई भ्र.तुकाराम वाघमारे यांची मुले आहेत.या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत,असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे.वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की,जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन,त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास,त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे १)तुकाराम पि.बाबुराव वाघमारे,२)देवनाबाई उर्फ देऊबाई भ्र.तुकाराम वाघमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०५/०३/२०२६ ही आहे.

आज दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | आदेशावरुन अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड